स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 21–07–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 3. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 4. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 5. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 14. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 15. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

**1.** श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
**2.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 106ः–**
**{समाज कल्याण विभाग}**

समाज कल्याण विभागा अंतर्गत स्व. अनुसयाबाई काळे स्मृती महिला समुपदेशन केंद्र (कौटुंबिक समस्या निवारण करण्याकरिता) 10 महिला समुपदेशन केंद्राची 10 झोनमध्ये संस्थांची नेमणुक करण्याकरिता आवश्यक निकषाप्रमाणे निवडावयाच्या प्रश्न तसेच,

समाज कल्याण विभागा अंतर्गत स्व. अनुसयाबाई काळे स्मृती महिला समुपदेशन केंद्र (कौटुंबिक समस्या निवारण करण्याकरिता) 10 महिला समुपदेशन केंद्राची 10 झोनमध्ये नियुक्त करावयाच्या संस्थेकरिता E.O.I. व्दारे आवेदने मागविण्याबाबत E.O.I. तयार करण्यात आलेला

असुन आवेदन कर्त्याकरिता आवश्यक असणारे निकष तसेच या योजने अंतर्गत नियुक्त संस्थेला करावयाची कार्य ठरविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

**स्थायी समिती ठराव क्र. १६२ दि. ३१/१०/२०१२ च्या अनुषंगाने स्व. अनुसयाबाई काळे स्मृति समुपदेशन केंद्र सुरु करण्यात आले. या दहा समुदपदेशन केंद्रास एक वर्षाकरिता चालविण्याकरिता स्थायी समितीने स्थायी समितीने परवानगी दिली होती परंतू स्थायी समितीच्या असे निर्देशनास आले की, गेली ४ वर्ष या केंद्रास विभागाद्वारे जी मुदतवाढ देण्यात आली त्या मुदतवाढीस सक्षम प्राधिकारणीची मंजूरी प्राप्त नाही. या अनुषंगाने स्थायी समितीने प्रश्न उपस्थित केल्यावर प्रशासनाने नियमाच्या अनुषंगाने योग्य स्पष्टीकरण स्थायी समितीस दिले नाही. आणखी असे की, समुपदेशन केंद्र चालविण्याकरिता राज्य शासनाचा निर्णय व मार्गदर्शक तत्वे यांचा विचार न करता स्वारस्य अभिरुची व निकष स्थायी समिती समोर सादर करतांना शासनाच्या मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने केले नाही. त्यामुळे ही स्थायी समिती खालील प्रमाणे सूचना देते आहे.**

**स्वारस्य अभिरुची व निकष (अटी व शर्ती) :-**

**१. एका संस्थेस एकापेक्षा जास्त केंद्रे मंजूर करण्यात येणार नाही.**

**२. संस्थेची निवड प्रथम एका वर्षासाठी असेल व काम समाधानकारक असल्यास पुढे मुदतवाढ देण्याचा विचार करण्यात येईल. परंतू आयुक्त यांचे शिफारसीने मुदतवाढीचे अधिकारी स्थायी समितीस असेल.**

**३. वर्षभर समुपदेशन केंद्राचा खर्च भागविण्याची संस्थेची आर्थिक क्षमता असावी.**

**४. संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.**

**५. नोंदणीकृत संस्था महिला व बाल विकासाच्या क्षेत्रात किमान ३ वर्ष कार्यरत असावी.**

**६. संस्थेस महिला व बालकांच्या समुपदेशनाचा किमान २ वर्षाचा अनुभव असावा.**

**७. समुपदेशकाची निवड महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.**

**८. संस्थेच्या योजना व कार्याबाबतचा मागील ३ वर्षाचा वर्षनिहाय वार्षिक अहवाल.**

**९. केंद्रासाठी महानगरपालिकेच्या झोनमध्ये २०० ते २५० चौ.फुट जागा व टेबल खुर्च्या, कपाट, दुरध्वनी उपलब्ध करुन देण्यात येईल.**

**१०. दुरध्वनी खर्च, विज बिल ज्या संस्थेद्वारे केंद्र चालविण्यात येईल. त्या संस्थेस करावा लागेल.**

**११. समुपदेशक शक्यतो महिला असतील त्यापैकी २ एम.एस.डब्ल्यु. व १ कायदेशाखेची पदविधर असेल. केंद्र सुरुवातीला ८ तास चालविले जाईल व नंतर २४ तास दूरध्वनीवरुन संपर्क साधून गरजु महिलेला मदत देण्यासाठी कार्यरत राहील.**

**१२. संस्थेचा मागील तीन वर्षाचा सनदी लेखापालची स्वाक्षरी असलेला वर्षनिहाय लेखा परिक्षण अहवाल.**

**१३. संस्थेने समुपदेशनाचे कार्य केल्याबाबतचा कार्याचा स्वतंत्र अहवाल, सांख्यिकी माहितीसह.**

**१४. संस्थेचे मागील तीन महिन्याचे माहितीनिहाय बॅंक स्टेटमेंन्ट.**

**१५. संस्थेची घटना व नियमावली (घटनेत महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे हा उद्देश असावा) ची साक्षांकित प्रत.**

**१६. संस्थेने वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे छायचित्र, कागदपत्रे, वृत्तपत्रातील कात्रणे जोडावीत.**

**१७. संस्थेच्या कार्यरत पदाधिकारी व कार्यकारिणीची नाव, पत्ता, व्यवसाय व दुरध्वनी क्रमांकासह यादी जोडावी.**

**१८. संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्य एकमेकांचे नातेवाईक नाहीत तसेच कोणीही सदस्य शासकीय सेवेत नाहीत याबाबतचे हमीपत्र सोबत जोडावे.**

**१९. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबाबत (अध्यक्ष व सचिव) उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे स्वाक्षरीचे विना दुराचार प्रमाणपत्र.**

**२०. संस्थेच्या नावाने संस्थेबाबत जनसामान्यांच्या तक्रारी नाहीत, संस्थेबाबत गैरव्यवहाराच्या तक्रारी नाहीत, तसेच संस्थेने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नाही याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र.**

**२१. नियुक्त केलेल्या समुहाचे काम असमाधानकारक असल्यास त्यांना पुढे मुदतवाढ देता येणार नाही.**

**२२. समुपदेशन केंद्राचे काम योग्य पध्दतीने चालू आहे किंवा नाही याबाबतचा प्रत्येक महिन्याचा अहवाल समाज कल्याण अधिकारी यांनी आयुक्त व स्थायी समितीस सादर करणे बंधनकारक राहील.**

२३. **केंद्रातील समुपदेशकास मासिक मानधन हे त्या संस्थेस धनादेशाद्वारे देणे बंधनकारक राहील व यांची माहिती प्रत्येक महिन्यास लेखा व वित्त विभागास देणे बंधनकारक राहील.**

**स्वयंसेवा संस्थांची निवड व समुपदेशकाची निवड अध्यक्ष, स्थायी समिती यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारप्रमाणे उपसमिती गठीत करण्यात येते. गठीत उपसमिती खालील प्रमाणे -**

१. **श्रीमती जयश्री वाडीभस्मे, स्थायी समिती सदस्या - उपसमिती अध्यक्ष**

२. **श्रीमती रिता अशोक मुळे, स्थायी समिती सदस्या - उपसमिती सदस्य**

३. **श्रीमती सरला नायक, स्थायी समिती सदस्या - उपसमिती सदस्य**

**वरील अटी व शर्तीच्या अनुषंगाने विभागाने ई.ओ.आय. मागवावा व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यावर स्थायी समितीद्वारे गठीत उपसमितीस समोर निर्णयाकरिता ठेवावा व गठीत उपसमितीने आपला अहवाल अंतीम मंजूरीकरिता स्थायी समितीसह समोर सादर करावा या सर्व वरील सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक 107ः— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. 29 अ हंसापुरी लाल बिल्डींग ते शेख बारी चौक पर्यंत सिमेंट कॉक्रिट रोड करणे व आर.सी.सी. पाईप लाईन टाकण्याचे कामास्तव मे. अमित कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा 0.99 टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. 29,69,312/— रकमेची एकमेव निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 108ः— {प्रकल्प विभाग} प्रभाग क्र. 7 येथील मानकापूर दहनघाट येथे LPG शवदाहीनी बांधकाम करण्यास्तव मा. श्री. अविनाशजी पांडे यांचे खासदार राज्यसभा स्थानिक खासदार निधी अंतर्गत रू. 46,18,050/— चे प्राकलनास प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे. व या कामाचे कंत्राट मे. दिप कन्स्ट्रक्शन यांना प्रदान करण्यात आले आहे.

सदरहु काम विशिष्ट स्वरूपाचे असल्यामुळे या कामास्तव म.न.पा. पॅनलवरील वास्तु विशारदाची नेमणुक करणे गरजेचे आहे. मे. स्पेस डिझाईनर प्रा.लि. हे म.न.पा. पॅनेलवरील आर्किटेक्ट आहे. त्यांचा अनुभव लक्षात घेता त्यांची सेवा घेण्यास हरकत नसावी.

म.न.पा. प्रचलित धोरणानुसार त्यांना या कामाच्या निविदेत्तर रकमेच्या 2.56 टक्के राशी पोस्ट टेंडर ॲक्टिव्हिटीसाठी देय आहे. (रू. 1,61,632/— ची तरतुद केलेली आहे.) करीता मे. स्पेस डिझाईनर प्रा.लि. यांची उपरोक्त कामास्तव वास्तुविशारद म्हणुन नेमणुक करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 109ः— {कर व कर आकारणी विभाग} आर्थिक वर्ष 2017—2018 करीता महानगरपालिका सभागृह ठराव क्र. 72 दिनांक04.03.2015 अन्वये मंजूर पध्दतीनुसार कर योग्य मुल्य निश्चित करून शहरातील इमारती व जमिनी करीता मिळकत कर आकारणी करून मागणी देयके मिळकत दारांना तामील होणे गरजेचे आहे. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे परिशिष्ट 'ड' प्रकरण '8' चे कराधान नियम क्र. 9 अन्वये आकारणी पुस्तक तयार करून शहरातील संबंधित मिळकतदारांना आकारणी पुस्तक पाहण्यासाठी व कराधान नियम क्र. 15 (1) अन्वये कर योग्य मुल्य रक्कमेवर तक्रार दाखल करणेची संधी देणे गरजेचे आहे. व तक्रार कराधान नियम क्र. 18 अन्वये सुनावणी घेवून, निर्णय घेवून, निकाली काढून, कराधान नियम 19 अन्वये आकारणी पुस्तक सुधारित करून, प्रमाणित करून मागणी देयक कराधान नियम क्र. 39 अन्वये मिळकतदारांना तामिल करणे अपेक्षित आहे. त्याकरीता आकारणी पुस्तकाचे प्रारूप तयार करण्यात आलेले आहे. व सदर्हू प्रारूपास स्थायी समितीची मान्यता प्राप्त करून घेणे अभिप्रेत आहे. तसेच आकारणी पुस्तकातील कोणत्याही भागाचा उतारा त्रयस्थ

नागरिकांना पाहीजे असल्यास स्थायी समिती ठरवेल त्याप्रमाणे शुल्क आकारून उतारा देणे कराधान नियम क्र. 14 (2) अन्वये अभिप्रेत आहे.

करीता आकारणी पुस्तकाच्या प्रारूपास मान्यता देण्याचा व त्रयस्थ व्यक्तींना उतारा देणेकरीता शुल्क रू. 15/— प्रती पृष्ठ आकारणेबाबत प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 110ः— {लोककर्म झोन क्र. 5} प्रभाग क्र. ६३ येथील अयोध्यानगर रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण दोन निविदाकाराची निविदांपैकी मे. ग्लोबल इंजिनिअरिंग वर्क्स यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ५३,०५,०१९/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 111ः— {प्रकल्प विभाग} प्रभाग क्र. 17 येथील शांतीनगर दहनघाट येथे LPG शवदाहीनी बांधकाम करण्यास्तव मा. श्री. अविनाशजी पांडे यांचे खासदार राज्यसभा स्थानिक खासदार निधी अंतर्गत रू. 46,18,050/— चे प्राकलनास प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे. व या कामाचे कंत्राट मे. दिप कन्स्ट्रक्शन यांना प्रदान करण्यात आले आहे.

सदरहु काम विशिष्ट स्वरूपाचे असल्यामुळे या कामास्तव म.न.पा. पॅनलवरील वास्तु विशारदाची नेमणुक करणे गरजेचे आहे. मे. स्पेस डिझाईनर प्रा.लि. हे म.न.पा. पॅनेलवरील आर्किटेक्ट आहे. त्यांचा अनुभव लक्षात घेता त्यांची सेवा घेण्यास हरकत नसावी.

म.न.पा. प्रचलित धोरणानुसार त्यांना या कामाच्या निविदेत्तर रकमेच्या 2.56 टक्के राशी पोस्ट टेंडर ॲक्टिव्हिटीसाठी देय आहे. (रू. 1,61,632/— ची तरतुद केलेली आहे.) करीता मे. स्पेस डिझाईनर प्रा.लि. यांची उपरोक्त कामास्तव वास्तुविशारद म्हणुन नेमणुक करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 112ः— {लोककर्म विभाग} राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान **(NUHM)** अंतर्गत तेलंगखेडी आयुर्वेदिक दवाखान्याचे परीसरात नविन ईमारतीचे बांधकाम करण्याचे कामाकरीता निविदा मागविल्या असता मे. जानव्ही इंटरप्राईजेस यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा ११% टक्के कमी दराची निविदा रू. ३९३१४७४/— (एकोणचाळीस लक्ष एकतीस हजार चारशे चवऱ्याहत्तर फक्त ) ची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 113ः— {हॉट मिक्स प्लॅन्ट} नागपूर महानगर पालिकेच्या हॉट मिक्स प्लान्ट विभागाकरिता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरीता निविदेतील दोन निम्नतम निविदाकार 1. मे. आर.बी.केवलरमाणी व 2. मे. एम.जी.वाघवाणी यांची वाटाघाटी नंतर प्राकलनिय दरांपेक्षा 19.5**%** कमी दराच्या रु. 1,60,96,216.00 राशीचे निम्नतम निविदा दर स्विकृत करुन, निविदेतील दोन निम्नतम निविदाकार 1. मे. आर.बी.केवलरमाणी व 2. मे. एम. जी.वाघवाणी यांना समप्रमाणात काम विभागुन प्रत्येकी रु. 80,48,108.00 इतके राशिचे काम देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 114ः–** केन्द्रशासनाचे राष्ट्रीय नद्या संवर्धन योजने (NRCP) अंतर्गत
**{प्रकल्प विभाग}** नागनदीचे प्रदुषण निर्मुलन करण्याकरीता तयार करण्यात आलेला विस्तृत प्रकल्प अहवाल (वि.प्र.अ.) ने राज्य शासन द्वारा केन्द्र शासनाकडे सादर केला आहे. केन्द्रशासनाचे दिशानिर्देशानुसार याबाबतचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल मेसर्स एन.जे.एस. इन्जिनियर्स इण्डिया लिमिटेड – नवी दिल्ली यांचे कडून तयार करण्यात आला होता. या वि.प्र.अ. मध्ये फक्त नागनदीचा समावेश होता. तथापी उत्तर नागपूर सिवेरेज झोन अंतर्गत सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची कामे प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्याकरीता आय.आय.टी. रुरकीचे निर्देशाप्रमाणे या वि.प्र.अ. मध्ये उत्तर नागपूर मधून वाहणारी पिवळी नदी या उपनदीचा समावेश करण्यात यावा. अशा सूचना प्राप्त झाल्यानुसार या प्रकल्पात पिवळी नदीचा समावेश करण्यात आला आहे. सदर नागनदी बोरनाला व पिवळी नदीच्या रू. 1252.33 किंमतीच्या विस्तृत प्रकल्प अहवालास केन्द्र शासनाने तत्वतः मान्यता दिली असुन निधिच्या उपलब्धतेकरीता केंद्रशासनाच्या वित्त विभागाकडे विचाराधिन आहे. या प्रकल्पातंर्गत 60 % केन्द्रशासन, 25 % राज्यशासनाचे शासकीय अनुदान व 15 % मनपा सहभाग प्रस्तावित आहे.

नागपूर महानगरपालिकेनी मुख्यतः नाग नदी पुनुरुर्जीवन प्रकल्प करिता विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करुन रु. 118.00 कोटीचा प्रकल्प पर्यावरण विभाग राज्य शासन यांना सादर केला व "राष्ट्रीय नदी संवर्धन योजने" अंतर्गत, प्रकल्प केन्द्र शासनाला सादर करण्याची विनंती केली. राज्य शासनाचे दिशा निर्देष प्रमाणे सुधारित प्रकल्प रु. 126.30 कोटीचे राज्य शासनाला पुर्नसादर करण्यात आले. राज्य शासनानी विस्तृत प्रकल्प अहवाल, शिफारसी सह राष्ट्रीय नदी संवर्धन संचनालय, केन्द्र शासनाला सादर केले. केन्द्र शासनाद्वारे आय.आय.टी. रुरकी संस्थान येथे विस्तृत प्रकल्प अहवाल चाचणी व शिफारस करिता पाठविण्यात आले. आय.आय.टी. रुरकी च्या संबंधित अधिकारी यांनी, नागपूर शहरात भेट दिली व नाग नदी ची मौका पाहणी केली. आय.आय.टी. रुरकी नी, नदी मध्ये वाहणारे साण्ड पाणी थांबविण्याकरिता, नागनदी पुनुर्जीवन प्रकल्प च्या एवजी "नाग नदी प्रदुषण निर्मूलन प्रकल्प" करिता मुळ प्रस्तावात बदल करण्याकरिता व एम.ओ.इ.एफ. च्या दिशा निर्देष प्रमाणे वि.प्र.अ. तयार करण्याकरिता, केन्द्र शासन मार्फत नागपूर महानगरपालिकेला निर्देष दिले. या करिता नागपूर महानगरपालिकेनी स्थायी समिती ठराव क्र. 513 दिनांक 27.01.2015 अन्वये, सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल बनविण्याकरिता तांत्रिक सल्लागार मेसर्स एन.जे.एस. इन्जिनियर्स इण्डिया लिमिटेड – नवी दिल्ली यांची रु. 67,41,600.00 /– ची वित्तीय प्रस्ताव मंजूर केली. विस्तृत प्रकल्प अहवालात मूळ प्रावधानानुसार केवळ नाग नदी व बोर नाल्याचा समावेश होता. प्रकल्पात नागपूर मध्य सीवेज झोन मध्ये निर्मित होणारे साण्ड पाणी चे संकलन व त्यावर प्रक्रिया चे कामांचा समावेश होता. तांत्रिक सल्लागारांची मा. आयुक्त, मुख्य अभियंता व संबंधित अधिकारी सोबत, नागपूर येथिल झालेली चर्चा चे अनुषंगाने, पिवळी नदी ही नाग नदी ची उप नदी म्हणूण प्रकल्प मध्ये समाविष्ठ करण्याकरिता निर्णय घेण्यात आले. यामुळे नागपूर उत्तर सीवेज झोन मध्ये होणारे साण्ड पाणी निर्मिती व त्यावर प्रक्रिया संबंधित कामाचा समावेश विस्तृत प्रकल्प अहवालात घेण्यात आला व नागनदी प्रदूषण निर्मूलन करिता प्रस्तावित विस्तृत प्रकल्प अहवालाचे माध्यमातून नागपूर शहराचे उत्तर व मध्य सीवेज झोन मध्ये साण्ड पाणी निर्मिती व त्यावर प्रक्रिया करिता प्रस्तावित खर्चास मंजूरी मिळाल्यावर तसेच नाग नदी, बोरनाला बरोबरच पिवळी नदी चे संवर्धन करणे, केन्द्रशासनाचे वित्तीय अनुदानातून शक्य होणार असे निर्देश दि. 11.07.2015 ला मा. आयुक्त यांच्या बैठकी दरम्यान तांत्रिक सल्लागारांना निर्गमित करण्यात आले.

या आदेशानुसार तांत्रिक सल्लागार मे. एन.जे.एस. यांनी विस्तृत प्रकल्प अहवालात पिवळी नदी चा समावेश केला, तसेच उत्तर सीवेज झोन करिता साण्ड पाणी निर्मिती व त्यावर प्रक्रिया करिता लागणारे खर्चास, प्रकल्पातंर्गत अंर्तभुत केले. तांत्रिक सल्लागारांनी अशा अतिरिक्त केलेल्या कामाकरीता रु. 42.00 लक्ष (सर्विस चार्जेस वगळून) मागणी केली. नागनदी करीता मंजूर करण्यात आलेल्या सल्लागारांच्या कामाचे पृथःकरणाच्या आधारावर या दराचे प्रमाणात पिवळी नदी प्रकल्पाचे कामाची किंमत रु. 51,90,295.00 मनपास द्यावी लागली असती त्यातही सल्लागारासोबत मनपाने वाटाघाटी करुन त्यांनी सादर केलेल्या देकारा पेक्षा कमी देकार रु. 39.90 लक्ष (सेवाकरासहीत) वाटाघाटी अंती अंतीम केला व या वाटाघाटी नुसार मान्य झालेली रक्कम मान्य असल्या बाबत सल्लागाराने त्यांचे पत्र क्र. NJSEI/NMC/2017-19 दि. 11 मे 2017 अन्वये मनपास कळविले आहे. त्यानुसार नागनदीच्या विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये पिवळी नदीचा (नागनदीची उपनदी) समावेश होउन

कामाचा व्याप्ती मध्ये वाढ झाल्यामुळे मे. एन. जे. एस. इन्जिन्यिर्स इण्डिया प्रा. लि. यांना आता पूर्वी करण्यात आलेल्या करारनाम्या अंतर्गत रु. 67,41,000/– (सेवाकरासहीत) या रकमे शिवाय, पिवळी नदी प्रकल्पाच्या केलेल्या कामाकरीता रु. 39,90,000.00 (सर्विस टॅक्स धरुन) चे अतिरिक्त भुगतान करणे आवश्यक आहे. त्यामुळे रु. 39,90,000.00 चे अतिरिक्त खर्चास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 115 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर